PDF Compressor Free Version

# टायटल सर्टीफिकेट

**विषय :–** मौजे भिवंडी, तालुका भिवंडी येथील भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील नगर भुमापन क्र. १०६७, १०६८, १०६९, १०७०/१, १०७०/२, १०७०/३, ३२७४, ३२७७ १) श्री. संजय महादेव कुंटे, २) श्री. राजेश महादेव कुंटे, ३) सौ. जान्हवी विजय भावे यांच्या मालकीच्या जमीनीचे टायटल सर्टीफिकेट.

**पडताळण्यात आलेले दस्त :–**

मी जमीन मालक यांनी दिलेल्या खालील दस्तांची पडताळणी केली.

| अनुक्रमांक | दिनांक | दस्ताचा प्रकार | मुळ प्रत/झेरॉक्स |
|---|---|---|---|
| १. | २१/१०/२०१६ | नगर भुमापन उतारे | मुळ प्रत |
| २. | ०९/११/२०१६ | हक्कसोड पत्र क्र ५५७३ | झेरॉक्स |
| ३. | ०७/०६/२०१३ | बांधकाम परवानगी | झेरॉक्स |
| ४. | ०७/०६/२०१३ | मंजुर नकाशा | झेरॉक्स |
| ५. | ०८/११/२०११ | हक्कसोड पत्र क्र ८४२९ | मुळ प्रत |
| ६. | २९/०६/२०१७ | विकसीत करारनामा क्र ४३३८/२०१७ व कुलमुखत्यारपत्र क. ४३३९/२०१७ | मुळ प्रत |

**मिळकतीचे वर्णन :–**

मौजे भिवंडी, तलाठी सजा भिवंडी, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे येथील भिवंडी निजामपुर शहर महानगरपालीकेच्या हद्दतील खालील वर्णनाची शेत जमिन,

| गांव | नगर भुमापन कं. | क्षेत्र (चौ. मीटर) |
|---|---|---|
| भिवंडी | १०६७ | ६६.९ |
| भिवंडी | १०६८ | १४४७.३ |
| भिवंडी | १०६९ | ३४.३ |
| भिवंडी | १०७०/१ | ४१.० |
| भिवंडी | १०७०/२ | ५८.५ |
| भिवंडी | १०७०/३ | ४२.६ |
| भिवंडी | ३२७४ | ६७.५ |
| भिवंडी | ३२७७ | ११२.०९ |
| | एकुण क्षेत्र | १८७०.१९ |

VAIBHAV E. BHOIR
481, Nandan Arcade 3rd Floor, Beside Ashok Nagar Gate, Above Regent Garden Hotel, Old Jakat Naka, Bhiwandi - 421 302. Dist. Thane (Maharashtra)
ADVOCATE

PDF Compressor Free Version

सर्च रिपोर्ट :—

| वर्ष | व्यवहाराची नोंद | वर्ष | व्यवहाराची नोंद |
|---|---|---|---|
| १९८८ | निरंक | २००३ | निरंक |
| १९८९ | निरंक | २००४ | निरंक |
| १९९० | निरंक | २००५ | निरंक |
| १९९१ | निरंक | २००६ | निरंक |
| १९९२ | **नोंद आहे** | २००७ | निरंक |
| १९९३ | निरंक | २००८ | निरंक |
| १९९४ | निरंक | २००९ | निरंक |
| १९९५ | निरंक | २०१० | निरंक |
| १९९६ | **नोंद आहे** | २०११ | **नोंद आहे** |
| १९९७ | निरंक | २०१२ | निरंक |
| १९९८ | निरंक | २०१३ | **नोंद आहे** |
| १९९९ | निरंक | २०१४ | निरंक |
| २००० | निरंक | २०१५ | निरंक |
| २००१ | निरंक | २०१६ | **नोंद आहे** |
| २००२ | निरंक | २०१७ | उपलब्ध नाही. |

**वर्ष १९९२ साली नोंदविलेले दस्त:—**

मौजे भिवंडी येथील नगर भुमापन क्र. १०६७ चे क्षेत्र १३२० चौ. फुट ची श्री. श्याम कोंडाजी काठवले यांनी श्री. महादेव गोविंद कुंटे यांचे लाभात दिनांक १७/०२/१९९२ रोजी दिलेली रजीस्टर कब्जा पावती क्र ७९६/४१७.

**वर्ष १९९६ साली नोंदविलेले दस्त:—**

मौजे भिवंडी येथील नगर भुमापन क्र. १०६७ मधील घर नं. ९७ चे शेठ परशुराम विद्यालय तर्फे श्री. विश्वास केशव कर्वे यांनी नव भारत एज्युकेशन सोसायटीचे लाभात दिनांक १०/०५/१९९६ रोजी दिलेली रजीस्टर लिव्ह ॲण्ड लायसन्स करार क्र ९२३/७०३.

**वर्ष २०११ साली नोंदविलेले दस्त:—**

मौजे भिवंडी येथील नगर भुमापन क्र. १०६७ चे क्षेत्र ६६.९ चौ. मीटर व नगर भुमापन क्र. १०६८ चे क्षेत्र ९२५ चौ. मीटर, नगर भुमापन क्र. १०६९ चे क्षेत्र ३४.३ चौ. मीटर, नगर भुमापन क्र. ३२७४ चे क्षेत्र ६७.५ चौ. मीटर, नगर भुमापन क्र. ३२७७ चे क्षेत्र ११२.०९ चौ. मीटर या मिळकतींचे श्री. वासुदेव गोविंद कुंटे व इतर यांनी दिनांक ०८/११/२०११ रोजी श्री. संजय महादेव कुंटे व इतर यांचे लाभात दिलेली रजीस्टर हक्कसोड पत्र क्र ८४२९.



VAIBHAV E. BHOIR
ADVOCATE

PDF Compressor Free Version

**वर्ष २०१३ साली नोंदविलेले दस्त:—**

मौजे भिवंडी येथील नगर भुमापन क्र. १०६७ चे क्षेत्र ६६.९ चौ. मीटर व नगर भुमापन क्र. १०६८ चे क्षेत्र १४४७.३ चौ. मीटर, नगर भुमापन क्र. १०६९ चे क्षेत्र ३४.३ चौ. मीटर, नगर भुमापन क्र. १०७०/१ चे क्षेत्र ४१.० चौ. मीटर, नगर भुमापन क्र. १०७०/२ चे क्षेत्र ५८.५ चौ. मीटर, नगर भुमापन क्र. १०७०/३ चे क्षेत्र ४२.६ चौ. मीटर, नगर भुमापन क्र. ३२७४ चे क्षेत्र ६७.५ चौ. मीटर, नगर भुमापन क्र. ३२७७ चे क्षेत्र ११२.०९ चौ. मीटर एकुण क्षेत्र १७५८.१ चौ. मीटर आणि जुना घर नं. २५४ चे क्षेत्र २००० चौ. मीटर, घर नं. २३९ चे क्षेत्र १९०० चौ. मीटर, घर नं. २३१ चे क्षेत्र १६०० चौ. मीटर, या मिळकतींचे श्री. संजय महादेव कुंटे व इतर यांनी दिनांक २४/०५/२०१३ रोजी श्री. राजेश महादेव कुटेयांचे लाभात दिलेली रजीस्टर कुलमुखत्यार पत्र क्र ४४५१.

**वर्ष २०१६ साली नोंदविलेले दस्त:—**

मौजे भिवंडी येथील नगर भुमापन क्र. १०७०/१ चे क्षेत्र ४१.० चौ. मीटर, नगर भुमापन क्र. १०७०/२ चे क्षेत्र ५८.५ चौ. मीटर, नगर भुमापन क्र. १०७०/३ चे क्षेत्र ४२.६ चौ. मीटर, या मिळकतींचे श्री. वासुदेव गोविंद कुंटे व इतर यांनी दिनांक ०९/११/२०१६ रोजी श्री. संजय महादेव कुंटे व इतर यांचे लाभात दिलेली रजीस्टर हक्कसोड पत्र क्र ५५७३.

मी सौ. अर्चना ठाकरे यांनी सदर मिळकतीचे मागील ३० वर्षापर्यंतचे दि. ३१/०७/२०१७ रोजी दिलेले सर्च रिपोर्टस पाहिले त्यात सौ. अर्चना ठाकरे यांना वर नमुद केलेल्या व्यहरांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यवहारांची नोंद सापडली नाही. सौ. अर्चना ठाकरे यांना त्या व्यतिरिक्त सदर मिळकतीसंबंधी कोणतेही सदर मिळकतींचे हस्तांतरण वा बोजा निर्माण होणाऱ्या व्यवहारांची नोंद दुय्यम निबंधक भिवंडी यांचे कार्यालयात सापडली नाही.

**मिळकतीची माहीती व निष्कर्ष:—**

मी सदर मिळकतीसंबंधीच्या दस्तऐवज व कागदपत्रांची पाहणी केली व त्याद्वारे नमुद करतो की, सर्व्हे नं. २७ पोट नं. ५ या जमीनीचे मुळ मालक हे श्री. नानाभाई शेठ कासार हे होते व सदरची जमीन ही श्री. लक्ष्मण नारायण कुंटे यांनी दि. २६/०४/२०१० रोजीच्या रजीस्टर खरेदीखतान्वये विकत घेतली.

श्री. लक्ष्मण नारायण कुंटे हे मयत झाल्यानंतर सदर जमीनीस त्यांचे वारस म्हणुन १) श्री. रामचंद्र लक्ष्मण कुंटे, २) श्री. गोविंद लक्ष्मण कुंटे, ३) श्री. हरी लक्ष्मण कुंटे व ४) श्री. दामोदर लक्ष्मण कुंटे यांच्या नावांची नोंद झाली. सदर वारसांच्या दि. ०४/०८/१९६५ च्या आपसांतील वाटणीपत्रान्वये सदरची जमीन ही श्री. गोविंद लक्ष्मण कुंटे यांच्या हिश्श्यांस आली व त्याबाबतचा फेरफार दि. ०९/०८/१९६५ रोजी मंजुर झाला.

VAIBHAV E. BHOIR
461, Nandan Arcade, 3rd Floor, Beside Ashok Nagar Gate, Above Regent Garden Hotel, Old Jakat Naka, Bhiwandi - 421 302. Dist. Thane (Maharashtra)
ADVOCATE

PDF Compressor Free Version

श्री. गोविंद लक्ष्मण कुंटे हे दि. २३/१२/१९८० रोजी मयत झाले असुन त्यांचे पश्चात १) श्रीम. लक्ष्मीबाई गोविंद कुंटे (पत्नी), २) सौ. मालती चिंतामण दातार (मुलगी), ३) श्रीम. निर्मला विनायक घारपुरे (मुलगी), ४) श्री. वासुदेव गोविंद कुंटे (मुलगा), ५) सौ. अंजली अनंत गोखले (मुलगी), ६) श्री. रघुनाथ गोविंद कुंटे (मुलगा), ७) श्री. महादेव गोविंद कुंटे (मुलगा) अशा वारसांची भोगवटदार म्हणुन नोंद झाली. त्या दरम्यान सर्व्हे नं. २७ पोट नं. ५ या जमीनीस नगर भुमापन क्रमांक देण्यात आले त्यापैकी नगर भुमापन क्रमांक १०६७, १०६८, १०६९, १०७०/१, १०७०/२, १०७०/३, ३२७४, ३२७७ हे आहेत.

दि. २९/०७/१९८७ रोजी १) श्रीम. लक्ष्मीबाई गोविंद कुंटे, २) सौ. मालती चिंतामण दातार, ३) श्रीम. निर्मला विनायक घारपुरे, ४) सौ. अंजली अनंत गोखले, यांनी नगर भुमापन क्र. १०६७, १०६८, १०६९, १०७०/१, १०७०/२, १०७०/३, ३२७४, ३२७७ ही मिळकत हक्कसोड पत्रान्वये १) श्री. वासुदेव गोविंद कुंटे, २) श्री. रघुनाथ गोविंद कुंटे, ७) श्री. महादेव गोविंद कुंटे यांचे नावे दिली.

श्री. महादेव गोविंद कुंटे हे दि. ०१/०८/२०१० रोजी मयत झाले असुन त्यांचे पश्चात त्यांचे वारस १) श्रीमती. साधना महादेव कुंटे २) श्री. संजय महादेव कुंटे ३) श्री. राजेश महादेव कुंटे ४) सौ. जान्हवी विजय भावे या वारसांची नोंद नगर भुमापनामध्ये दि. १४/१२/२०१० रोजी झाली.

त्यानंतर दि. ०८/११/२०११ रोजी रजीस्टर क्र. ८४२९/२०११ हक्कसोड पत्रान्वये मौजे भिवंडी येथील नगर भुमापन क्र. १०६७ चे क्षेत्र ६६.९ चौ. मी., १०६८ मधील एकुण क्षेत्र १४४७.५ पैकी ९२८ चौ.मी., ३२७४ चे क्षेत्र ६७.५ चौ.मी., ३२७७ चे क्षेत्र ११२.०० चौ.मी., १०६९ चे क्षेत्र ३४.३ चौ.मी., या मिळकती मधील १) श्री. वासुदेव गोविंद कुंटे, २) श्री. रघुनाथ गोविंद कुंटे, ३) श्रीमती. साधना महादेव कुंटे यांचा अविभक्त हिस्सा हा १) श्री. संजय महादेव कुंटे, २) श्री. राजेश महादेव कुंटे, ३) सौ. जान्हवी विजय भावे यांचे लाभात दिला.

तसेच, दि. ०९/११/२०१६ रोजीच्या रजीस्टर हक्कसोडपत्र क्र. ५५७३/२०१६ अन्वये १) श्री. वासुदेव गोविंद कुंटे, २) श्री. रघुनाथ गोविंद कुंटे, ३) श्रीमती. साधना महादेव कुंटे यांनी मौजे भिवंडी येथील सिटीएस नं. १०७०/१ चे क्षेत्र ४१.०० चौ.मी., १०७२/२ चे क्षेत्र ५८.५ चौ.मी., १०७०/३ चे क्षेत्र ४२.६ चौ.मी. या मिळकती मधील आपला अविभक्त हिस्सा १) श्री. संजय महादेव कुंटे २) श्री. राजेश महादेव कुंटे ३) सौ. जान्हवी विजय भावे यांचे लाभात दिलेला आहे.

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेची दि. ०७/०६/२०१३ रोजीची बांधकाम परवानगी क्रमांक १९/भिवंडी/२०१३–१४पहिली असता असे दिसुन येते की, सीटीएस नं. १०६७, १०६८, १०६९, १०७०/१, १०७०/२, १०७०/३, ३२७४, ३२७७ ची एकुण मिळकत १८७०.१९ चौ.मी. ही १) श्री. संजय महादेव कुंटे, २) श्री. राजेश महादेव कुंटे, ३) सौ. जान्हवी विजय भावे यांचे मालकीची असुन सदर मिळकतीपैकी ५७० चौ. मी. जागेवर कांचन गौरी को. ऑप हौ. सो. ही तळ



VAIBHAV E. BHOIR
461, Nandan Arcade, 3rd Floor, Beside Ashok Nagar Gate, Above Regent Garden Hotel, Old Jakat Naka, Bhiwandi - 421 302. Dist. Thane (Maharashtra)
ADVOCATE

PDF Compressor Free Version

अधिक पाच मजल्याची इमारत बांधण्यात आली असुन त्यातील फ्लॅटस हे विविध इसमांच्या नावाने विकत दिलेले आहेत. तसेच वरील मिळकतीपैकी १४० चौ.मी. जागेवर सुरभी बिल्डींग ही तळ अधिक सहा मजल्याची इमारत बांधुन त्यातील फ्लॅटस व गाळे हे विविध इसमांना विकत दिलेल्याची नोंद दिसुन येत आहे. सदर दोन्ही इमारतीचे ७१० चौ. मी. क्षेत्र वगळु वर उल्लेख केलेल्या सीटीएस नं. १०६७, १०६८, १०६९, १०७०/१, १०७०/२, १०७०/३, ३२७४, ३२७७ मधील एकुण १८७०. १९ चौ. मी. क्षेत्रापैकी ११६०.१९ चौ. मी. क्षेत्र हे १) श्री. संजय महादेव कुंटे २) श्री. राजेश महादेव कुंटे व ३) सौ. जान्हवी विजय भावे यांचे मालकी व कब्जेवहीवाटीची असल्याचे दिसुन येते.

तसेच दिनांक २९/०६/२०१७ मौजे भिवंडी येथिल सीटीएस नं. १०६७, १०६८, १०६९, १०७०/१, १०७०/२, १०७०/३, ३२७४, ३२७७ ही मिळकत १) श्री. संजय महादेव कुंटे, २) श्री. राजेश महादेव कुंटे, ३) सौ. जान्हवी विजय भावे यांनी विकसीत करारनामा क्र. ४३३८/२०१७ अन्वये विकसीत करणेकामी मे. ॲडप्लस इंम्प्रेशन प्रा. लि. तर्फे डायरेक्टर, सौ. रश्मी अतुल भातखळकर, यांना दिलेली असुन त्यासोबत सदर विकसीत कराराची पुर्तता करणेकामी रजीस्टर कुलमुखत्यारप्रत्र क्र. ४३३९/२०१७ दिलेले आहे.

## प्रमाणपत्र

*याद्वारे प्रमाणपत्र (Title Certificate) देण्यात येते की, मौजे भिवंडी येथिल सीटीएस नं. १०६७, १०६८, १०६९, १०७०/१, १०७०/२, १०७०/३, ३२७४, ३२७७ ही मिळकत १) श्री. संजय महादेव कुंटे, २) श्री. राजेश महादेव कुंटे, ३) सौ. जान्हवी विजय भावे यांचे मालकी व कब्जेवहीवाटीची असुन सदरची मिळकत ही त्यांनी दिनांक २९/०६/२०१७ रोजीच्या विकसीत करारनामा क. ४३३८/२०१७ अन्वये विकसीत करणेकामी मे. ॲडप्लस इंम्प्रेशन प्रा. लि. तर्फे डायरेक्टर, सौ. रश्मी अतुल भातखळकर, यांना दिलेली आहे. सदर मिळकत ही सर्व बोजारहीत व विक्रीयोग्य असुन मे. ॲडप्लस इंम्प्रेशन प्रा. लि. यांचेकडे सदर मिळकतीचे विकसनाचे अधीकार आहेत.*

**दिनांक :– ०४/०८/२०१७**
**ठिकाण :– भिवंडी.**

VAIBHAV E. BHOIR
ADVOCATE
451, Nandan Arcade, 3rd Floor,
Beside Ashok Nagar Gate,
Above Regent Garden Hotel, Old Jakat Naka,
Bhiwandi - 421 302. Dist. Thane (Maharashtra)